# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 172/2024 दिनांक : 15.05.2024

## 1)खुन :–

**वजिराबाद :–**दिनांक 13.05.2023 रोजी चे रात्री 23.30 वा. चु सुमारास, **मनपा पाण्याच्या टाकीजवळ वजिराबाद नांदेड येथे,** यातील **मयत नामे संदीप गंगाधर मेटकर, वय 35 वर्षे, रा. वडर गल्ली चिखलवाडी वजिराबाद नांदेड,** हा व त्याचा मित्र रणबिरसिंग ऊर्फ सोनु महाराज हे दोघेजण मनपा पाण्याच्या टाकीजवळ बसलेले असताना यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून तेथे जाऊन पुर्वी झालेल्या भांडणाच्या कारणावरून रणबीरसिंग ऊर्फ सोनु महाराज यास लोखंडी रॉडने मारहाण करीत असतांना फिर्यादीचा मयत भाऊ हा त्यांचे भांडण सोडवित असतांना लक्ष्मण पवार याने त्यास तु मला गेल्या दिड वर्षापुर्वी मारला होतास, तुला आता दाखवतो असे म्हणुन त्या तिघांनी मारहाण करून त्याचे डोके भिंतीवर आपटुन त्याचा खुन केला. वगैरे **फिर्यादी संजय गंगाराम मेटकर, वय 30 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. वडर गल्ली चिखलवाडी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 220/2024 कलम 302, 324, 323, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री लोणीकर, मो.नं. 9422336474** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :–

**अर्धापुर :–**दिनांक 13.05.2024 रोजी 21.30 वा. चे सुमारास, **वसमतफाटया पासुन अंदाजे दोन किमी अंतरावर आमराई जवळच्या आखडयावरील रोडवर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व दुकानातील गडी चांदु असे मोटार सायकलने फिर्यादीचे गावाकडे मेंढला येथे जात असताना यातील अनोळखी तीन ते चार आरोपीतांनी संगणमत करून स्वीफ्ट डिझायर कार फिर्यादीचे मोटार सायकलचे आडवी लावुन त्या कारमधुन तीन ते चार जण अनोळखी इसम उतरून फिर्यादीचे मोटार सायकलला धडक देवुन खाली पाडली त्यांच्या जवळील धारधार चाकुचा धाक दाखवुन लाथाबुक्याने मारहाण करून फिर्यादी जवळ असलेली नगदी दोन लाख रूपयाची बॅग व दोन मोबाईल व सिमकार्ड तसेच दोघा जवळील पॉकेट जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी देवराजा शंकरराव नवले, वय 24 वर्षे, व्यवसााय बळीराजा ऑनलाईन मल्टी सर्विसेस अर्धापुर रा. मेंढला ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 222/2024 कलम 394, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री कदम, मो. नं. 7083552233** हे करीत आहेत.

## 3)जनावर चोरी :–

**बिलोली :–** दिनांक 14.05.2024 रोजी चे 12.00 ते 04.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे प्लॉटमधुन बिलोली ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे प्लॉट मध्ये बांधलेले दोन बैल किंमती 45,000/–रूपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी नबाजी पि. माधवराव कोपोले, वय 29 वर्षे, व्यवसाय शेती रा. कोंडलवाडी रोड बिलोली ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 76/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2542 सोनकांबळे, मो.क्रं. 9822172300** हे करीत आहेत.

## 4)अवैध रेती चोरी :–

**देगलुर :–** दिनांक 14.05.2024 रोजी चे रात्री 01.15 वा. चे सुमारास, **देगलुर भक्तापुर रोड ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून बिना परवाना बेकायदेशिररीत्या रॉयलटी न भरता आपले हायवा टिपर क्रमांक एमएच–26/बीई–9996 पाच ब्रास लाल रंगाची रेती किंमती 25,000/–रू ची चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/सुधाकर दत्ता मलदोडे, ने. पोस्टे देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 205/2024 कलम 379, 34 भादवी सह कलम 48(7) महसुल कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2822 कनकवळे, मो.क्रं. 8830899396** हे करीत आहेत.

## 5)भारतीय हत्यार कायदा :–

**1)इतवारा :–**दिनांक 14.05.2024 रोजी चे 15.45 वा. चे सुमारास, **कापुस संशोधन केंद्राच्या बाजुच्या सिमेंटच्या नाल्यावर देगलुर नाका नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात एक गावठी पिस्टल व एक जिवंत काडतुस व एक तलवार, एक चाकु बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/चंद्रकांत सुभाष स्वामी, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 129/2024 कलम 3/25, 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री जाधव, मो.क्र. 8999881900** हे करीत आहेत.

**2)इतवारा :—**दिनांक 14.05.2024 रोजी चे 17.00 वा. चे सुमारास, **हबीब टॉकीज जवळ गाडीपुरा जाणारे रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात खंजर बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/हबिब जाबर चाऊस, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 128/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1982 सरोदे, मो.क्र. 9850752288** हे करीत आहेत.

## 6)गंभीर दुखापत :–

**इतवारा :—**दिनांक 12.05.2024 रोजी चे 18.30 वा. चे सुमारास, **भारत मेडीकलचे समोर भाजीपाला मार्केट रोडचे बाजुस इतवारा नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून क्षुल्लक कारणावरून शिवीगाळ करून लोखंडी रॉडने मारून उजवा हात फॅक्चर करून गंभीर दुखापत केली. व कटरने उजवे हातावर मारहाण करून थापडबुक्याने मारहाण केली. जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी अब्दुल रहिम पि. नजिर अहेमद, वय 54 वर्षे, व्यवसाय मिस्त्री काम रा. फत्तेबुरूज कालापुल नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 130/2024 कलम 326, 324, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1207 बेडदे, मो. नं. 8888873282** हे करीत आहेत.

## 7)विवाहीतेचा छळ :—

**1)शिवाजीनगर :—** दिनांक 10.11.2024 रोजी चे 11.00 ते दिनांक 14.11.2024 चे 17.00 वा. चे दरम्यान, **देगावचाळ नांदेड येथे,** यातील नमुद आकरा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे माहेरहुन कार घेण्यासाठी 5,00,000/—रू घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून तुला नांदवुन घेत नाही म्हणुन शारिरीक माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच पहिली पत्नी असतांना यातील आरोपीतांनी दुसरे लग्न लावुन दिले. वगैरे **फिर्यादी 41 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 164/2024 कलम 498(अ), 494, 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2753 लियाकत, मो.क्रं. 9923799345** हे करीत आहेत.

**2)मरखेल :—** सन 2019 लग्न झाल्यानंतर दोन महीण्यापासुन ते आज पावेतो, **फिर्यादीचे सासरी मौ. मंगरूळ ता. जळकोट जि. लातुर ह. मु. मरखेल ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईचे नवऱ्यास धंदा टाकण्यासाठी म्हणुन तुझे माहेरहुन दोन लाख रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच वगैरे **फिर्यादी 26 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 97/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/94 अब्दुल बारी, मो.क्रं. 7776067774** हे करीत आहेत.

**3)मुखेड :—** सन 2015 पासुन तीन ते आज पावेतो, **फिर्यादीचे सासरी मौ. बनवस ता. पालम जि. परभणी ह. मु. अशोकनगर मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईचे नवऱ्यास कार घेण्यासाठी म्हणुन तुझे माहेरहुन पाच लाख रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. तसेच वगैरे **फिर्यादी 30 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 156/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2322 गोंटे, मो. क्रं. 9822618672** हे करीत आहेत.

## 8)प्राणी संरक्षण अधिनियम :—

**माहुर :—** दिनांक 14.05.2024 रोजी चे सकाळी 05.45 ते 06.00 वा. चे दरम्यान, **मौ. कुपटी टी पॉईंट जवळ ता. माहुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररीत्या 9 गायी व 1 बैल असे 10 जनावरांना निर्दयीपणे क्रुरपणे चारही पाय बांधुन बोलेरो पिकअप क्रमांक टीएस–20/टी 1896 मध्ये दाटी वाटी गोंडवसा ते हिमायतनगर येथे कतलीकरीता नेत असतांना मळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/पवनकुमार गजानन राऊत, ने. पोस्टे माहुर** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे माहुर** गुरनं 55/2024 कलम 5, 5(अ),5(ब), 5 (क) 9,9 (अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम 1976 सुधारणा 2015 सह कलम 11(1)(ड)(11)(1)(ई)(फ) प्राणी छळ अधिनियम 1960 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री वाठोरे, मो. नं. 9923178909** हे करीत आहेत.

## 9)जुगार :—

**1)वजिराबाद :—** दिनांक 14.05.2024 रोजी चे 19.25 वा. चे सुमारास, **कलामंदीर येथे वाईन शॉपचे बाजुस नांदेड येथे,** यातील नमुद दोन आारोपीतांनी बिना परवाना बेकादेशीररीत्या मिलन डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवीत असताना नगदी 1500/—रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2083 दत्तराम भाऊराव जाधव, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 222/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1230 गव्हाणकर, मो.नं. 9923494694** हे करीत आहेत.

**2)धर्माबाद :–** दिनांक 14.05.2024 रोजी चे 14.30 वा. चे सुमारास, **आंध्रा बसस्थानक रोडवरील सना हॉटेलच्या बाजुस रोडवर मोकळया जागेत धर्माबाद ता. धर्माबाद जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या श्रीदेवी, माधुरी नावाचा मटका जुगार खेळत व खेळवीत असताना नगदी 2960/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/1806 दिपक राजाराम पवार, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे धर्माबाद** गुरनं 121/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1181 कुमरे, मो.नं. 8975769508** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड